Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

| VOL- VII | ISSUE- VIII | AUGUST | 2020 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 6.293 | ISSN 2349-638x |
|---|---|---|---|---|---|---|

# संगमनेर तालुक्यातील माध्यमिक शाळेतील गणित / विज्ञान शिक्षकांच्या व्यावसायिक पात्रता विकसनाचा अभ्यास

**श्री. आण्णासाहेब सावळेराम चोथे**
( संशोधक)
ॲड.विठ्ठलराव हांडे शिक्षणशास्त्र
महाविद्यालय,नाशिक

**डॉ.सुचेता संकपाळ**
(मार्गदर्शक)
ॲड.विठ्ठलराव हांडे शिक्षणशास्त्र
महाविद्यालय,नाशिक

**सारांश –**

जगातील सर्वात सन्मानिय व्यवसाय हा शिक्षकाचा आहे. सर्व व्यवसायामध्ये अध्यापक व्यवसाय हा अत्यंत वेगळा आहे आणि सर्व व्यवसायांचा पाया आहे. देशाचे भविष्य वर्गा वर्गात घडत असते असे कोठारी आयोगाने आपल्या अहवालात नमूद केले आहे.

पाठ्यपुस्तक हे साधन आहे. साध्य नाही याची जाणीव शिक्षकाला असणे आवश्यक आहे. असे म्हटले जाते दागिना जेव्हा घडतो तेव्हा सोन आणि कारागिर दोघेही तेवढाच ताकतीचे असावे लागतात. याप्रमाणे विद्यार्थांचे अध्यापन प्रभावी असणे आवश्यक आहे. म्हणून शिक्षकांच्या व्यावसायिक पात्रतेचा विकास ही काळाची गरज आहे. सदरच्या संशोधनात गणित / विज्ञान शिक्षकांच्या व्यावसायिक पात्रता तपासण्यात आली असुन त्याच्या परिणामकारकता तपासण्यात आली असून त्याच्या परिणामकारकतेचा अभ्यास करण्यात आला आहे.

**प्रस्तावनाः-**

शिक्षक हा शिक्षण प्रक्रियेतील महत्वाचा घटक असल्यामुळे शिक्षकास अनन्यसाधारण असे महत्व आहे. सामाजिक दृष्टीकोनातून शिक्षक ही एक व्यक्ती नसून प्रचंड अशी शक्ती आहे असे म्हणावे लागेल. विद्यार्थ्यांची शिक्षकावर प्रचंड श्रध्दा असते. या श्रध्देला तडा जावु नये म्हणुन शिक्षकाने अधिकची गुणवत्ता प्राप्त केली पाहिजे. सामाजिक बांधिलकीचा विचार करुन भविष्यातील उत्तम पीढी निर्माण करण्यासाठी शिक्षकांनी व्यावसायिक पात्रतेचे विकसन करणे ही काळाची गरज आहे.

व्यावसायिक कौशल्याचे विविध घटक अध्ययन अध्यापनात प्रभावीपणे मांडण्यासाठी विषयाची व्यावसायिक पात्रता वाढविणे आवश्यक आहे. प्रस्तुत संशोधनात संगमनेर तालुक्यातील गणित / विज्ञान शिक्षकांच्या व्यावसायिक पात्रतेबाबत माहिती घेवून त्याचा शैक्षणिक संपादनावर झालेल्या परिणामकारकतेचा अभ्यास करण्यात आला आहे.

रविंद्रनाथ टागोर म्हणतात

एक तुझी जळती पणती
उजळील दिवे लाखों गणती।।

रविंद्रनाथ टागोरांचे वरील उदगार शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठी द्योतक आहे.

**संशोधनाची गरजः-**

शिक्षकी व्यावसायात प्रवेश केल्यानंतर अध्यापनाची विविध कौशल्ये आणि अभिरुची महत्वाची असल्यामुळे विषयाचे सखोल ज्ञान महत्वाचे असते. विद्यार्थांच्या अध्ययन अध्यापनाच्या दृष्टिने गुणवत्तापूर्ण शिक्षकांची माहिती इतर शिक्षकांना व्हावी आणि प्रत्येक शिक्षकाने स्वतः चा व्यावसायिक विकास करावा या हेतूने सदरच्या संशोधनाची गरज आहे. माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्याचा पाया रचला जातो आणि आयुष्याला वेगळे वळण प्राप्त होत असते म्हणुन या वर्गांना शिकविणा-या गणित आणि विज्ञान विषयांच्या शिक्षकांची व्यावसायिक पात्रता विकसन गरजेचे आहे.

जगभरातील मुलामुलींना दर्जेदार गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे म्हणून जुन ते सोनं आणि नवं तेही हवंएँ या उक्तीप्रमाणे सदरच्या संशोधनाची गरज आहे.

**संशोधनाचे महत्वः-**

१) शिक्षणधिका-यांना शाळेची तपासणी करताना उच्च गुणवत्ताधारक शिक्षकांची माहिती मिळेल.
२) मुख्याध्यापकांना शिक्षकांची नेमणूक करताना उच्च व्यावसायिक पात्रता असणा-या शिक्षकांची नेमणुक करता येईल.
३) शिक्षकांचा व्यावसायिक कल तपासण्यासाठी प्रशासनाला उपयोगी होईल.

४) सेवेत असणा-या इतर शिक्षकांना स्वतःची व्यावसायिक पात्रता वाढविण्यासाठी मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळेल.
५) सर्वेक्षणातून मिळालेले निष्कर्ष हे पालक व शिक्षक यांना उपयुक्त ठरतील.
६) सर्वेक्षणातून मिळालेले निष्कर्ष माध्यमिक शिक्षकांची व्यावसायिक पात्रता विकसनाची सध्यस्थिती तपासण्यासाठी उपयुक्त ठरतील.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :-**

१) माध्यमिक शाळेतील गणित / विज्ञान शिक्षकांच्या व्यावसायिक पात्रतेची माहिती मिळविणे.
२) शैक्षणिक संपादनाचा आढावा घेवून शिफारशी करणे.
३) व्यावसायिक पात्रता विकसनाच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.
४) शिक्षकांची व्यावसायिक अर्हता वृध्दी करणे. करण्यासाठी कृतिकार्यक्रमांची निर्मिती करणे.

**परिकल्पनाः-**

**संशोधन परिकल्पनाः-**

माध्यमिक शिक्षकांनी व्यावसायिक पात्रतेचे विकसन केल्यामुळे त्यांचे शैक्षणिक संपादन परिणामकारकता आढळून येते.

**शुन्य परिकल्पनाः-**

माध्यमिक शिक्षकांनी व्यावसायिक पात्रतेचे विकसन केल्यामुळे त्यांचे शैक्षणिक संपादन परिणामकारकता आढळून येत नाही.

**संशोधन साधनेः-**

संशोधनासाठी संशोधकाने पुढील प्रमाणे साधन निर्मिती केली आहे.

१) शिक्षकांची पुर्व चाचणी
२) पाठ निरीक्षण
३) मुख्याध्याप्क मुलाखती.
४) प्रश्नावली
५) निरीक्षण नोंदी
६) संख्यास्त्रीय साधने - शेकडेवारी

**संशोधन कार्यपध्दतीः-**

संशोधनाच्या उद्दिष्टानुसार माध्यमिक शाळेतील गणित / विज्ञान शिक्षकांच्या व्यावसायिक पात्रतेच्या विकसनाची माहिती घेण्यासाठी सर्वेक्षण पद्धती वापरण्यात आली. तसेच परिणामकारक तपासण्यासाठी प्रमाणित चाचणी देण्यात आली आणि त्यावरुन शैक्षणिक संपादनाच्या माहितीचा अभ्यास करण्यात आला. निवडलेल्या ३० विद्यालयातील एकुण ८० शिक्षकांची माहिती संकलीत केली असून त्याच शिक्षकांनी चाचणी देण्यात आली. तसेच त्यांच्या पाठनिरिक्षणाच्या नोंदी करण्यात आल्या

**माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन –**

| प्रतिसादक संख्या | शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| ८० | बी.एस्सी | ५४ | ६८ |
| | एम.एस्सी | २६ | ३३ |
| | बी.एड | ७१ | ८९ |
| | एम.एड | ९ | ११ |
| | एम.फिल. | ० | ० |
| | पि.एच.डी. | ० | ० |

वरील प्राप्त माहितीवरुन एम.एस्सी. शैक्षणिक पात्रता असलेल्या शिक्षकांचे प्रमाण ३३ इतके आहे. व्यावसायिक पात्रता एम.एड. शिक्षकांचे प्रमाण ११ इतके आहे. एम.फिल व पि.एच.डी. शिक्षकांचे प्रमाण शुन्य आहे.

उच्च व्यावसायिक पात्रता असणा-या शिक्षकांच्या चाचणीतील संपादनामध्ये लक्षणीय फरक दिसुन आला आहे. यावरुन पुढीलप्रमाणे शिफारशी करण्यात आल्या आहेत.

**शिफारशीः-**

१. माध्यमिक शाळेतील शिक्षकांनी शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेचे विकसन करावे.
२. शैक्षणिक चर्चासत्रे, कार्यशाळा व प्रशिक्षणे यात शिक्षकांनी सहभागी होवुन अध्यापनाची कौशल्ये अवगत करावी.
३. उच्च व्यावसायिक पात्रतेचे विकसन करुन विद्यार्थांचा सर्वांगिक विकास करावा.
४. शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्यासाठी शिक्षकांनी स्वतःचा व्यावसायिक विकास करावा.
५. शिक्षकांना व्यावसायिक गुणवत्तावाढीसाठी सेवांतर्गत प्रशिक्षण द्यावे.
६. माध्यमिक शिक्षणाची गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करावेत.

**संदर्भ सुचीः-**

१. विकासपीडीया

2. Teacher of India.Org शिक्षक, प्रशिक्षण- सतत व्यावसायिक विकास

३. दुनाख़े,अरविंद(१९९८), शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन आणि समुपदेशन, पुणेः नूतन प्रकाशन

४. घोरमोडेम,यु.के.आणि घोरमोडे,क (२०१०) शैक्षणिक मार्गदर्शन आणि समुपदेशन, नागपूरः विद्या प्रकाशन

५. भारतीय प्रबंध संस्थान इंदोर- शिक्षक विकास कार्यक्रम